

# मालविकाग्निमित्र

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय [illegible]
दा. क्र. ५७६९

IRBK-0105766

५७६६

संस्कृत साहित्य सरिता : १४

कालिदास-कृत

# मालविकाग्निमित्र

कथासार
ल. द. बेंबळकर
बी. ए. (ऑनर्स), बी. टी., काव्यतीर्थ.



वोरा अॅन्ड कंपनी, पब्लि… लि०

IRBK-0105766

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अॅन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

# संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत-साहित्य-सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्हीं योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

# परिचय

कविश्रेष्ठ कालिदासाचीं तीन नाटकें उपलब्ध आहेत. एक 'मालविकाग्निमित्र,' दुसरें 'विक्रमोर्वशीय' आणि तिसरें 'शाकुंतल' यांपैकीं 'शाकुंतल' हें नाटक जगद्विख्यात झालेलें आहे.

या कवीच्याबद्दल फारच थोडी माहिती आज उपलब्ध आहे. या नाटकाच्या प्रस्तावनेंत खुद्द कवीनेंच लिहिल्यामुळें असें कळून येतें कीं, भास नांवाच्या कवीच्यानंतर हा कवि झाला; आणि भासाइतकी लोकप्रियता आपणास कदाचित् लाभणार नाहीं, अशी शंकाहि त्याच्या मनांत डोकावत होती. पण त्याची खात्री होती कीं लोक सज्जन आहेत, ते चांगलें-वाईट याची नीट परीक्षा करतील आणि चांगलें असेल त्याचाच स्वीकार करतील.

'मालविकाग्निमित्र' ही एक प्रेमकहाणी आहे. राजा किती विलासी होता, त्याचें स्पष्ट दर्शन यांत झालेलें दिसून येतें. अंतःपुरांतील घडामोडींचें चित्रणहि अगदीं यथार्थतेनें केलेलें दिसून येईल.

स्वभावचित्रणांत विदूषकाचें चित्र अप्रतिम आहे. इतका प्रभावी आणि कारस्थानी विदूषक दुसरा आढळणार नाहीं. राणी धारिणीचें चित्रहि यथार्थतेनें रंगविलेलें आहे.

या नाटकांत शाकुंतलाइतके गुण नसले, तरी पण कालिदासाचे काव्यगुण आणि नाट्यरचनाकौशल्य यांत कांहीं कमी आहे, असें दिसत नाहीं.

—लेखक

# मालविकाग्निमित्र

फार प्राचीन काळीं या भरतखंडावर शुंग वंशाचें राज्य होतें. त्या वंशांत पुष्यमित्र शुंग हा महापराक्रमी राजा होऊन गेला. त्याला अग्निमित्र नांवाचा एक मुलगा होता. तोहि महापराक्रमी होता. त्या अग्निमित्रावर राज्य सोंपवून पुष्यमित्र दूर निघून गेलेला होता. तेथें त्यानें अश्वमेध आरंभिलेला होता. तो सेनापति पुष्यमित्र म्हणूनच ओळखला जात असे. अग्निमित्र हा अत्यंत विलासी होता. याचें वर्णन 'रघुवंशांत'हि आलेलें आहे.

अग्निमित्राला दोन राण्या होत्या. एक धारिणी, आणि दुसरी इरावती. धारिणी ही ज्येष्ठ होती आणि इरावती ही नृत्यकलेमध्यें निपुण होती.

धारिणीला वसुमित्र नांवाचा एक मुलगा आणि वसुलक्ष्मी नामक एक कन्या होती. वसुमित्र मोठा होता आणि तो आपले आजोबा जे सेनापति पुष्यमित्र महाराज त्यांच्याच यज्ञाला मदत करण्यासाठीं दूर गेलेला होता.

वसुलक्ष्मी ही एक लहान अजाण बालिका होती. इरावतीला कांहीं अपत्य नव्हतें. अग्निमित्राचें राज्य विदिशा ( मिथिला ) नगरींत पसरलेलें होतें.

त्याच्या शेजारींच विदर्भ देशाचें राज्य होतें. यज्ञसेन व माधवसेन या नांवाचे दोन भाऊ तेथें राज्य करीत होते. त्यांच्यामध्यें कलह होता. तेव्हां आपल्याला एकाद्या प्रबळ राजाचें साहाय्य असावें म्हणून माधवसेनानें अग्निमित्राची मदत मागितली. राजा अग्निमित्रानें वीरसेन नांवाचा आपला सीमा प्रांतावरील अधिकारी माधवसेनाकडे मदतनीस म्हणून पाठविला. हा वीरसेन धारिणीचा एक हलक्या कुळांतला भाऊ होता.

याची मदत मिळण्याच्या अगोदरच यज्ञसेनानें माधवसेनाचा पराभव केलेला होता. घनघोर लढाई होऊन माधवसेन कैद झाला. माधवसेनाचा प्रधान आर्य सुमति नांवाचा होता. त्यानें आपला पाडाव होत आहे, हें पाहून आपली बहीण कौशिकी आणि माधवसेनाची बहीण मालविका यांसह वेषांतर करून पलायन केलें. वाटेंत विदिशा नगरीला जाणारा एक काफला त्यांस भेटला, त्यांत तीं तिघें मिसळून गेलीं. त्यांची वाट अरण्यांतून

होती. तेथून जात असतांना चोरटयांनीं त्यांजवर हल्ला केला. त्यांत त्या काफिल्याची दाणादाण झाली. आर्य सुमति मारला गेला. मालविका कोठें नाहींशी झाली. आणि कौशिकीनें भावाचा अंत्यसंस्कार करून संन्यासदीक्षा धारण करून विदिशेची वाट धरली. तेथें राणी धारिणीच्या विश्वासास ती पात्र झाली.

इकडे मालविकेला त्या चोरटयांनीं पळविलें होतें. पण वीरसेनानें चोरटयांचा पराभव केला आणि मालविकेस सोडविलें. ही मुलगी आपली बहीण जी धारिणी तिच्या तैनातीस योग्य आहे, असें समजून वीरसेनानें तिला धारिणीकडे पाठवून दिलें. ही मुलगी नृत्यसंगीत इत्यादि कलांच्या अभ्यासास योग्य आहे, असें समजून राणीनेंहि तिला नृत्यशाळेंत ठेविलें. एवढी सुंदर मुलगी राजाच्या दृष्टीस पडणें योग्य नाहीं, अशा समजुतीनें ती तिची विशेषच काळजी घेत असे.

अग्निमित्राच्या नृत्यशाळेंत दोन नाटयाचार्य होते. एकाचें नांव गणदास आणि दुसऱ्याचें हरदत्त. दोघेहि आपआपल्या विद्यांमध्यें निष्णात होते. त्यांपैकीं गणदास हा वडील होता, आणि त्यास राणी धारिणीचा आश्रय होता. दुसरा हरदत्त,

तो राजाचा आश्रित होता. राणीनें मालविकेला त्या नृत्य-शाळेंत घातली, तेव्हां ती या दोघांच्याहि अधिकाराखालीं आली. दोघेहि मोठ्या परिश्रमानें तिला शिकवीत असत. तिच्या नैपुण्यानें दोघांनाहि समाधान होत होतें. राजाला मात्र या मालविकेसंबंधीं कांहींच माहिती नव्हती.

आणि एकदां असें झालें—

राणी धारिणी नृत्यशाळेमध्यें गेली होती. तिचा दासींचा परिवारहि तिच्याबरोबर होता. राजकन्या वसुलक्ष्मीहि तेथेंच होती. राणी धारिणीचें एक चित्र काढलेलें होतें. त्याचेंच ती सूक्ष्म अवलोकन करीत होती. आणि तेवढ्यांत राजा अग्निमित्रहि तेथें आला.

दासी आणि राणी बाजूला झाल्या. राजा त्या चित्राचें अवलोकन करूं लागला. पाहातां पाहातां त्याला चित्रांत इतर दासींच्या घोळक्यांत मालविका दिसली. या दासींच्यामध्यें ही सुंदर दासी कोण असावी, याचा तो विचार करूं लागला. त्यानें राणीला विचारलेंहि. राणीनें तिकडे दुर्लक्षच केलें. तिला जें टाळावयाचें होतें, तेंच तिच्यासमोर प्राप्त झालें होतें. तिनें राजानें पुनः पुन्हा विचारूनसुद्धां उत्तर दिलें नव्हतें. पण राजकन्या वसुलक्ष्मी,

ती लहान होती. तिनें पटकन् उत्तर दिलें–' ही तर मालविका आहे.' थोरामोठ्यांच्या मनांतले डावपेंच लहान मुलीला कसे समजून येणार ? राजाचें काम झालें. त्याला नांव समजलें. ती त्याच्या मनांतहि भरली होती.

त्याला आतां ती दृष्टीला पडल्यावांचून करमेना. राणीहि जास्तच लक्षपूर्वक तिला राजाच्या दृष्टीआड ठेऊं लागली. राजानें फक्त चित्रांत तिला पाहिलें होतें–ती प्रत्यक्ष दिसूं नये म्हणून राणीची धडपड चालू होती. आणि राजाला तर तिला प्रत्यक्ष पाहाण्याची अनिवार उत्कंठा लागून राहिली.

याबाबतींत त्याचा विदूषक त्याच्या फार उपयोगीं आला. त्यानें एक युक्ति योजिली, आणि राजाच्या दृष्टीसमोर मालविका येऊं शकली. त्याचें असें झालें–

गणदास आणि हरदत्त हे दोघेहि आपआपल्या विद्यांमध्यें निष्णात होते. त्यांच्यामध्यें जर कलह उत्पन्न केला, तर आपलें काम अधिक सुकर होईल, असें विदूषकाला वाटलें. दोन सारख्या योग्यतेचे लोक एकमेकांचे मत्सरी असतात, हें त्यास माहीत होतें. तेव्हां त्यानेंच असें ठरविलें

कीं, ' या दोघांच्यापैकीं श्रेष्ठ कोण, तें ठरविलें पाहिजे. नाहींतर व्यर्थ यांना पगार कां द्यावयाचा ? '

ही शंका त्या दोघांच्याहि मनांत घर करून बसली. आणि दुसऱ्याच दिवशीं नाट्याच्या अभ्यासाच्या वेळेलाच दोघेहि आचार्य राजाकडे भांडत आले. राजा दरबारांत बसलेला होता. त्याला मात्र या भांडणाचें आश्चर्य वाटत होतें.

गणदास प्रथम म्हणाला, " महाराज, मोठ्या मोठ्या माणसांच्यासमोर या हरदत्तानें म्हटलें कीं, ' हा गणदास माझ्या पायाच्या धुळीच्याहि किंमतीचा नाहीं. ' महाराज, मी श्रेष्ठ गुरूकडून अध्ययन केलेलें आहे. मीं माझ्या विद्येचा प्रयोगहि करून दाखविलेला आहे. म्हणून विनंती अशी कीं याचा निर्णय व्हावा. "

हरदत्तानें सांगितलें कीं, " महाराज, हाच गणदास मला उद्देशून म्हणाला कीं, ' हा हरदत्त आणि मी गणदास या दोघांत डबकें आणि समुद्र यांच्यांत जेवढें अंतर, तेवढें अंतर आहे. ' तेव्हां याचाहि निर्णय होणें आवश्यक आहे."

विदूषकाची कल्पना खरी ठरली. दोघे तर भांडूं लागलेच. पण मालविका कशी दृष्टीस पडणार ?

२०९५८



राजानें त्या दोघांचें म्हणणें ऐकून घेतलें आणि 'निर्णय केला पाहिजे,' असा अभिप्राय प्रगट केला. पण राजा एकटाच कसा या दोघांचें श्रेष्ठ-कनिष्ठत्व सांगू शकणार? कारण गणदासाच्या बाजूनें कौल द्यावा, तर हरदत्त आपलाच आश्रित. आणि हरदत्ताच्या बाजूनें म्हणावें तर राणीला पक्षपात केला असें वाटेल. म्हणून राणीलाहि बोलवावें, असें त्यानें ठरविलें. पण राजा-राणी हीं दोघेंहि या बाबतींत निर्णय देण्यास अपात्र होतीं. कारण दोघें दोन बाजूचीं होतीं. म्हणून पंडिता कौशिकीलाहि बोलवावें, असें त्यानें ठरविलें. ती स्वत: या शास्त्रांत जाणती होती आणि विशेष म्हणजे ती नि:पक्षपाती होती. म्हणून राजानें त्या दोघींना बोलावून आणलें.

विदूषकाची करामत येथेंच दिसून आली. राणी धारिणीला हा प्रसंगच मुळीं यायला नको होता. गणदासाला तिनें या शुष्क कलहापासून परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण गणदास कांहीं ऐकेना. आणि विदूषक म्हणूं लागला कीं, या दोन एडक्यांची टक्कर जर केली नाहीं, तर यांना पोसावेंच कशाला ? गणदासाला वाटूं लागलें कीं, राणी माझा पराजय होईल, याला भीत आहे. आपल्या गुणावर जगतां येत नसेल, केवळ राणीच्या

कृपेवरच आपलें जीवन जगवावयाचें असेल, तर त्याचा काय उपयोग ? या त्याच्या मानी वृत्तीचा फायदा विदूषकाला मिळाला आणि अखेर राणीनें संमति दिली.

तितक्यांत पंडिता कौशिकी पुढें सरसावली. ती म्हणाली— “ या दोन नाट्याचार्यांची परीक्षा करावयाची म्हणजे त्यांनीं आपल्या शिष्येला जें शिकविलें आहे, त्याचीच परीक्षा करावयाची. शिष्य जर कांहीं कारणानें तेवढा योग्य ठरला नाहीं, तर असला कमी प्रतीचा शिष्य पत्करण्यानें गुरूचाच दोष उघड होतो. तेव्हां माझ्या मतानें असें वाटतें कीं मालविकेला शर्मिष्ठेची कृति असलेलें चतुष्पद छलिक नृत्य सांगावें. आणि अंगावर वस्त्रें कमींत कमी धारण केलेलीं असावींत. कारण त्या योगानें शरीराचें सौष्ठव नीटपणें न्याहाळतां येणें शक्य होईल. ”

ही सूचना सर्वांना मान्य झाली. दरबारांतील मंडळी नाट्यगृहाच्या रोखानें निघाली. राणी धारिणीला मात्र राहवेना. ती फटकळपणानें म्हणून गेली, “ अशा तऱ्हेची चिकित्सक दृष्टि जर राजकार्यांत दाखविली जाईल, तर बरें होईल ! ” पण तिचें ऐकणार कोण ? सगळेच तिच्या

विरुद्ध. सर्व कांहीं अप्रिय तें निमूटपणें तिनें आतां सहन केलें पाहिजे होतें. विदूषकानें जिंकलें होतें.

गणदास वडील म्हणून त्याला पहिला मान मिळाला. मालविला रंगमंचावर आली मात्र; राजाची दृष्टि तिजवर खिळून गेली. मालविका गायिली आणि तिनें नृत्यहि केलें. राजानें तें पाहिलें खरें, पण तो तिच्या रूपांतच गुंगून गेलेला होता. सर्व अभिनय पार पडला. मालविका पडद्याआड जाण्यास निघाली. तेवढ्यांत विदूषकानें दोष काढला. तो म्हणाला, "अहो, मी ब्राह्मण. मी येथें असतांना मला नमस्कार न करतांच या नृत्याला सुरुवात झाली, हाच मोठा दोष." सर्वजण हंसले. पण तेवढेच क्षण मालविकेला रंगमंचावर उभें राहावें लागलें आणि त्यामुळें तितकाच अधिक वेळ राजाच्या दृष्टीसमोर ती राहूं शकली. वास्तविक दोष दर्शविण्यामध्यें विदूषकाचा हाच हेतु होता. त्यानें राजाला म्हणूनहि दाखविलें कीं, "माझें एवढेंच सामर्थ्य."

आतां हरदत्ताची पाळी आली. पण दुपारची वेळ झाली

होतीं. स्नान-भोजनाची ती वेळ म्हणून हरदत्ताची परीक्षा दुसऱ्या दिवसावर लोटण्यांत आली.

अग्निमित्राची एक बाग होती. प्रमदवन तिचें नांव. तेथें झोपाळेहि होते. धारिणी, इरावती वगैरे तेथें जात आणि झोके घेत बसत. परंतु एकदां एक झोपाळा तुटला आणि त्यावर बसलेली धारिणी जमिनीवर आदळली. तिचा पाय सपाटून दुखावला; इतका कीं तिला राजवाड्याच्या बाहेरहि पडतां येईना. तिला त्याचें फार वाईट वाटलें.

तिच्या वाईट वाटण्याला पायाच्या दुखावण्याशिवाय आणखीहि एक कारण होतें. ऋतुराज वसंताचें आगमन झालें होतें. सर्व झाडें पालवलीं होतीं. नवीन फुलें फुलत होतीं. नवीन फळें धरत होतीं. परंतु त्या प्रमदवनांत जो एक अशोक वृक्ष होता, त्याला मात्र नवीन पालवी आलेली नव्हती. मदोन्मत्त अशा एकाद्या सुंदर युवतीच्या पादप्रहाराची तो अपेक्षा करीत असावा. पण ही राणी धारिणी तर घरींच पडून होती. मग त्याला लाथ कोण मारणार? शेवटीं विचार करून हा आपला अधिकार तिनें मालविकेला दिला. तिला तिनें सर्व वस्त्रप्रावरणांनीं भूषविली आणि आपले पैंजण तिच्या पायांत घातले. मालविका नटूनथटून

प्रमदवनांत आली. तिच्याबरोबर तिची मैत्रीण बकुलावलिकाहि होती.

त्याच सुमारास राजाहि प्रमदवनांत आलेला होता. राणी इरावतीनें राजाला आपल्याबरोबर झोल्यावर यावें, यासाठीं कुरबक पुष्प पाठवून संकेत ठरविला होता. राजाला करमत नव्हतेंच. विदूषकानें या संकेताची त्याला आठवण दिली आणि तो त्याप्रमाणें प्रमदवनांत आला. तेथें अकस्मात् साजशृंगार केलेली मालविका त्याच्या दृष्टीला पडली. त्याला आश्चर्य वाटलें. पण ही काय करीत आहे, हें जाणण्याच्या इच्छेनें तो तेथें जवळच लपून राहिला.

संकेत ठरविल्याप्रमाणें इरावतीहि आपली दासी निपुणिका हिच्यासह त्याच प्रमदवन बागेंत आली होती. तिच्याहि दृष्टीस मालविका पडली. तीहि थबकलीच. आणि पुढें काय होतें, हें पाहाण्यासाठीं तीहि जवळच लपून बसली.

बकुलावलिकेनें मालविकेच्या पायाला आळता लावला. तो ओला होता. तो वाळविण्यासाठीं तोंडानें फुंकर घालीत ती म्हणाली–“ तूं आतां राणीसारखीच शोभतेस! ”

माल.—मी तुला आवडतें, म्हणून तूं असें म्हणतेस, इतकेंच.

बकु.—मलाच नव्हे. गुणांमध्यें रंगून जाणाऱ्या राजाचीहि तूं आवडती आहेस.

माल.—तूं आपल्या मनचें कांहीं तरी म्हणतेस.

बकु.—माझ्या मनचें नव्हे. हें भाषण राजाचें, पण तोंड मात्र दुसऱ्याचें, इतकेंच.

माल.—राणी धारिणीची आठवण झाली, म्हणजे हें खरें म्हणवत नाहीं.

बकु.—भुंगे येतील आणि पीडा करतील, म्हणून कोणी आम्रांचा मोहोर कानांवर घालीत नाहींत काय ?

याप्रमाणें मुग्धमधुर भाषणें करीत बकुलावलिकेनें मालविकेच्या मनांत 'नसती इच्छा' निर्माण केली. इरावतीच्यासुद्धां हें लक्षांत आलें. ती म्हणाली सुद्धां— "दूतीचें काम चांगलें केलेंस बरें बकुलावलिके!"

मालविकेला सर्व रीतीनें भूषविलेलें होतेंच. तेव्हां बकुलावलिका तिला म्हणाली, "हा पाहा. उपभोगास योग्य असा हा तुझ्या समोरच आहे." त्यावर मालविकेनें

सहजच कुतूहलानें विचारलें, "कोण तो ?" ती मिस्किल दासी म्हणाली, "हा तो अशोक वृक्ष ! दुसरा कोण ?" याप्रमाणें बोलून मालविकेला त्या अशोकाला लाथ मारण्यास तिनें उद्युक्त केलें. तिनें लत्ताप्रहार केला, तोंच राजा तिच्यासमोर प्रगट झाला. अर्थातच मालविका लाजून गेली.

राजाच्या प्रणयाला योग्य तो अवसर मिळाला होता. त्यानें तिची "पाय फार दुखावला का," म्हणून चौकशी केली. आतां कांहीं अतिप्रसंग घडणार असें इरावतीला वाटलें. ती रागानें लाल झाली आणि तशी थरथरतच तीहि पुढें आली. राजा तिला पाहातांच एकदम वरमला. बकुलावलिकेसह मालविका निघून गेली. ती मात्र आतां फार घाबरून गेली होती.

इरावतीचा क्रोध अनावर झाला होता. तिची समजूत घालण्याचा राजानें पुष्कळ प्रयत्न केला, पण व्यर्थ. ती तशीच परत निघून गेली. राजालाहि फारच वाईट वाटलें.

ही सर्व हकीकत इरावतीनें राणी धारिणीच्या कानावर घातली. अर्थातच धारिणीलाहि क्रोध आला आणि मालविकेची स्थिति 'मांजरानें धरलेल्या कबुतरासारखी' झाली. राजाला याची जाणीव होतीच. तरीहि चौकशी

करतां कळून आल्यावर त्याला फारच वाईट वाटलें. 'मालविकेची सुटका कशी करावी,' याचा त्याला मोठा विचार पडला. पण त्याला इतकें काळजींत पडण्याचें काय कारण ? त्याचा मदतनीस विदूषक होता ना त्याच्याबरोबर!

राजाला कळलेंच होतें कीं राणी धारिणीचा पाय मुरगळला आहे आणि ती बाहेर पडूं शकत नाहीं. तेव्हां तिच्या समाचाराला त्यानें जाणें भाग होतें. तो तिकडे गेला. तेथें राणी धारिणी पंडिता कौशिकीच्या बरोबर गप्पासप्पा करीत पडलेली होती. राजाच्या आगमनाबरोबर ती उठून उभी राहिली. राजानें तिला उपचारपूर्वक आसनावर बसविलें. तेवढ्यांत विदूषक तेथें रडत ओरडतच आला. त्यानें आपल्या हातांचीं बोटें आपल्याच दुसऱ्या हातानें दाबून धरलीं होतीं. त्याच्या तोंडाला फेस आल्यासारखा दिसत होता, त्याला पाहातांच राजा घाबरूनच गेला.

विदूषक बडबडत होता, "राजा, मी आतां मरणार, माझ्यामागें माझी निपुत्रिक आई आहे, तिची नीट व्यवस्था ठेव. हा मी मेलोंच ! मित्रा, राणीला भेटण्यासाठीं म्हणून यावयाला निघालों होतों, पण रिकाम्या हातांनीं कसें

भेटावयाचें ? म्हणून एक पुष्पगुच्छ आणण्यासाठीं मी बागेंत गेलों. तेथें एका झाडावरचा एक गुच्छ पाहिला. तो घ्यावा म्हणून मी हात पुढें केला, तों काय ? त्यावर एक भयंकर साप होता. त्यानें पटकन् मला दंश केला. हे पाहा त्याचे दोन दांत, कसे स्पष्ट दिसत आहेत. सर्व विष अंगांत भिनलें आहे. मेलों मी आतां." आणि लवकरच तो बेशुद्ध पडला.

राजाला काय करावें तें सुचेना. राणी तर स्त्रीच. पंडिता कौशिकी म्हणाली, "साप जेथें चावला असेल, ती जागा कापून तरी टाकली पाहिजे, नाहींतर जाळून तरी टाकली पाहिजे. हें विषवैद्याचें काम आहे. तरी यास विषवैद्याकडे न्यावें." राजाच्या आज्ञेनें जयसेना नांवाची दासी विदूषकास ध्रुवसिद्धी नांवाच्या विषवैद्याकडे घेऊन गेली.

ध्रुवसिद्धीनें चिकित्सा केली आणि निरोप पाठविला कीं, "यास साप चावला आहे. तेव्हां ज्यावर सापाचें कांहीं चित्र रेखाटलेलें किंवा खोदलेलें असेल, असें कांहीं तरी, जें अगदीं हाताशीं असेल असें तात्काळ पाठवून द्यावें. कारण त्या पाण्याचा अभिषेक करावयाचा आहे.

तसें कांहीं मिळालें नाहीं, तर याच्या जिवाची कांहीं खात्री नाहीं."

राणीला वाईट वाटत होतें. आपल्याच कारणानें हा ब्राह्मण मृत्यु पावत आहे ही गोष्ट तिच्या मनाला लागून राहिली होती. 'सापाच्या चिन्हाचें कांहीं तरी हाताशीं असलेलें पाहिजे,' हें ऐकल्याबरोबर तिनें आपल्याच हातांत असलेली नागमुद्रा काढून ती जयसेनेच्या हातांत दिली. 'बिचारा ब्राह्मण जगो,' हीच तिची इच्छा होती. जयसेनेनें ती अंगठी घेतली आणि ती ध्रुवसिद्धीकडे निघून गेली.

हें सर्व कांहीं नीट जमून आलें !

पण त्या विदूषक ब्राह्मणाचें काय झालें ? दुसरें काय व्हावयाचें ? त्याला मुळीं साप चावलाच नव्हता ! केवड्याच्या फुलाच्या कांट्यांनीं त्यानें आपल्या बोटांना जखम करून घेतली होती. आरडाओरडीचें तें नुसतें ढोंग होतें. कोणी त्याला ध्रुवसिद्धीकडे नेलेंहि नाहीं आणि ध्रुवसिद्धीनें कांहीं आणावयासहि सांगितलें नव्हतें. ही सर्व बतावणी होती. पण मग हें सर्व कशासाठीं ? ती नागमुद्रा मिळविण्यासाठीं. आणि ती कशासाठीं ? तर....

राणी धारिणीनें मालविकेला पकडून एका तळघरांत डांबून ठेविलें होतें. तिची मैत्रीण बकुलावलिकाहि तेथेंच होती. त्यांच्यावर कडक पहारा होता. माधवसेना नांवाची दासी तेथें पहारा करीत होती. राणीच्या खास दिमतींतील असल्या कारणानें तीं कोणाचेंहि जुमानणारी नव्हती. राणीची नागमुद्रा दाखविल्याशिवाय मालविकेची कांहींहि वार्ता कळणें अशक्य होतें. तेव्हां काय वाटेल तें करून ती राणीची नागमुद्रा हस्तगत करणें आवश्यक होतें. त्यासाठींच विदूषकानें एवढें कारस्थान रचलें होतें.

विदूषकानें त्या नागमुद्रेच्या बळावर मालविकेची सुटका करण्याचा घाट घातला खरा, पण तो सर्वस्वीं सिद्धीस जाणें तितकें सोपें नव्हतें. कारण माधवसेना मोठी चाणाक्ष होती. विदूषकाच्या हातीं ती राणीची नागमुद्रा पाहातांच तिला संशय आलाच. तिनें विदूषकाला विचारिलें, " काय रे, ही नागमुद्रा राणीनें तुझ्याबरोबर कशी पाठविली ? इतर कोणी दासी नव्हत्या का ? " पण विदूषक तिच्या सवाई होता. तो म्हणाला, " निरोप पाठविण्याला फार घाई झाली. मी जवळच होतों, म्हणून माझ्या हातीं ही नागमुद्रा दिली आणि तुझ्याकडे द्यावयास सांगितलें. "

माधवसेनाहि हुषारच होती. तिनें पुन्हा विचारलें, "काय रे, पण या मालविकेला सोडण्याचें काय कारण?" विदूषकानें तितक्याच हुषारीनें तात्काळ उत्तर दिलें, "आजचा दिवसच वाईट आहे. आजचें जें नक्षत्र आहे, त्याला ग्रहण लागणार आहे. म्हणून सर्वजणांना, जे जे कोणीं बंधनांत आहेत, त्यांना त्यांना, सोडून द्यावें, अशी राजाची आज्ञा झालेली आहे. मालविकेला सोडण्यास सांगण्यासाठीं मी आलों आहें." यावर ती बिचारी दासी काय बोलणार ? तिनें मालविकेची सुटका केली; आणि मालविका व बकुलावलिका यांना घेऊन विदूषक प्रमदवनांत आला. तेथें पूर्वसंकेताप्रमाणें राजाहि आलेला होता. राजा आणि मालविका एका ठिकाणीं असतां आपण तेथें असणें बरें नव्हे, म्हणून बकुलावलिका आणि विदूषक त्या बागेच्या बाहेरच्या बाजूस आले. तेथें असलेल्या एका रुंद शिलापट्टावर तो आडवा झाला आणि त्याला श्रमामुळें तात्काळ झोंप लागली. बकुलावलिका तेथेंच आडोशाला बसून राहिली.

विदूषक बागेच्या बाहेर शिलापट्टावर झोंपलेला आहे, हें इरावतीच्या एका दासीनें पाहिलें. तिनें ही हकीकत

इरावतीला सांगितली. तिलाहि आश्चर्य वाटलें. ‘ राजाहि मग तेथेंच असला पाहिजे. ’ हा विचार मनांत येतांच तीहि तिकडे निघाली.

प्रमदवनांत प्रवेश करीत असतांनाच तो ब्राह्मण तिच्या दृष्टीस पडला. ती तेथें कांहीं क्षण उभी राहाते, तों तिला आश्चर्य वाटलें आणि रागहि आला. कारण तो ब्राह्मण स्वप्नांत बडबडत होता, “ हे मालविके, तूं इरावतीला मागें टाक. ” आपला अपमान झालेला कोणाला आवडेल? तिची दासी निपुणिका तिच्या बरोबरच होती. तिलाहि राग आला. आणि कांहीं कुचेष्टा करावी म्हणून एक वांकडें तिकडें लांकूड घेऊन तें त्याच्या अंगावर तिनें फेंकून दिलें. त्याबरोबर तो ओरडतच उठला. सर्पाकार लांकूड पाहून तो घाबरून गेला. त्याचें तें किंचाळणें ऐकून बागेंत असलेला राजा धांवत बाहेर आला. त्याच्याबरोबर मालविकाहि आली. आणि जी शंका इरावतीच्या मनांत उद्भवलेली होती ती खरी ठरली. तिचा राग आणखी वाढला.

आतां राजाला कांहींतरी बतावणी करावयाला पाहिजे होती. तो नम्रपणानें इरावतीची समजूत घालीत होता.

पण इरावतीला पक्कें समजून चुकलें होतें कीं राजानेंच विदूषकाकरवीं मालविकेला सोडवून आणलें होतें. ती राजाला झिडकारून निघून गेली.

मालविका तर घाबरून गेली होती. आपली अवस्था आतां काय होणार, तें तिला समजेना. ती मागल्या पावलींच बकुलावलिकेसह तेथून निघून गेली.

राजा आणखीच संकटांत सांपडला. सर्वच कांहीं विपरीत घडून आलें होतें. इरावती रागावलेली, मालविका घाबरलेली आणि धारिणी फसलेली. काय करावें हें त्यास सुचत नव्हतें. एवढ्यांत एक दासी घाबरत घाबरत आली आणि म्हणाली, " महाराज, पिंगल नांवाच्या वानरानें राजकन्या वसुलक्ष्मीला अत्यंत भिवविलें आहे. ती बेशुद्ध पडली आहे. " राजा घाबरला. तो तात्काल वसुलक्ष्मीकडे निघाला. त्याला एवढेंच बरें वाटलें कीं आत्तांच्या प्रसंगांतून तरी आपली सुटका झाली आहे. विदूषकानें तर तसें म्हणूनहि दाखविलें.

त्या पिंगल वानराच्या प्रमाणेंच आणखी एक गोष्ट तशीच हिताची घडून आली. त्या बागेची रक्षक असणारी

दासी अत्यानंदानें ओरडत सुटली कीं, " अशोक वृक्षाला फुलें आलीं. अशोक वृक्षाला फुलें आलीं. "

या आनंदाचा अर्थ असा होता कीं, मालविकेच्या लत्ताप्रहारानें ज्या अर्थी अशोक फुललेला आहे, त्या अर्थी अगोदर जाहीर केल्याप्रमाणें धारिणी राणीला मालविकेची इच्छा पूर्ण करणें भाग आहे. सर्वांचें लक्ष आतां दुसरी-कडेच वळलें.

राणी धारिणीला ही हकीकत समजली. तिला आनंद झाला. तिनें राजाकडे निरोप पाठविला कीं ' आपण फुल-लेल्या अशोक वृक्षाची शोभा अवलोकन करण्यास तिकडे प्रमदवनांत येणें करावें. '

राणी धारिणीनें नित्याप्रमाणें ब्राह्मणांना दक्षिणा दिली. कुमार वसुमित्र जेव्हांपासून यज्ञाच्या रक्षणासाठीं गेला होता, तेव्हांपासून ती अशी दररोज वेदवेत्त्या ब्राह्मणांस दक्षिणा देत असे. हा तिचा नित्यक्रम जेव्हां संपला, तेव्हां तिनें आपला भाऊ वीरसेन याच्याकडून आलेलें पत्र वाचून घेतलें. तेवढ्यांत पंडिता कौशिकी तेथें आली. तिनें राणीला सांगितलें कीं, " तूं नेहमीं म्हणतेस, कीं वेशभूषा करण्यांत मी निष्णात आहें. तर मग आज या मालविकेला

विवाह–योग्य वेषानें सजीव बरें ! पाहूं तुझें कौशल्य. "

राणीनें संमति दिली.यथायोग्य रीतीनें तिनें मालविकेला सजविलें. पंडिता कौशिकीहि संतुष्ट झाली. आणि राणी मालविकेसह प्रमदवनांत आली.

राजा अगोदरच तेथें आलेला होता. विदूषक बरोबर होताच. तो म्हणाला, " राजा, आज ही राणी धारिणी तुझेहि पण मनोरथ पूर्ण करणार आहे, असें वाटतें. कारण तिनें या मालविकेला हीं उंचीं वस्त्रें लेववून इकडे आणिलेलें आहे. इतकेंच नव्हे, तर आपल्या देखतसुद्धां ही मालविकेला बाजूला करीत नाहीं. "

राणीहि पण आल्यानंतर त्याला म्हणाली, " महाराज, हा अशोक वृक्ष आपलें संकेतगृहच करण्याचें आम्ही ठरविलें आहे. " यावर राजा काय उत्तर देणार ?

विदूषकानें तर राणीच्या समोर सर्वांना समजेल अशीच चेष्टा केली. मालविकेकडे पाहात तोः राजाला म्हणाला, " अरे, ती बघ! "

राणी–कोण ती ?

विदूषक—ती अशोक वृक्षाची शोभा.

हा असा थट्टाविनोद चालला असतांताच अमात्यानें पाठविलेल्या दोन नर्तकी तेथें येऊन उभ्या राहिल्या. वीरसेनाकडून आलेल्या त्या नर्तकी माधवसेनाच्या दरबारांतील होत्या. राजानें राणीला विचारलें. राणीनें मालविकेला विचारलें, " मालविके, यांतील कोणती तुला हवी आहे ? "

'मालविके', म्हटल्याबरोबर त्या नर्तकी चपापल्या. त्यांनीं नीट निरखून पाहिलें आणि त्या एकदम म्हणाल्या, " अहो, ही तर आमची राजकन्या मालविका ! "

आतां आश्चर्याची लाट चोहोंकडेच उसळली. राणीला वाईट वाटलें. 'रेशमी वस्त्र मी पायपुसणें म्हणून वापरलें,' अशी हळहळ तिला वाटली. त्या नर्तकींना विचारतांच त्यांनीं सर्व सांगितलें. आर्या कौशिकीनें पुढील हकीकत सांगितली. ती म्हणाली, " आर्य सुमतीची जी बहीण ती मीच. ही तीच मालविका आहे, हें मला माहीत होतें. तरीपण वर्षभर मी अगदीं स्तब्ध राहिलें. "

राजा, राणी इत्यादिक सर्वांनींच विचारलें, " पंडिता

कौशिकी, आपण एक वर्ष कां स्तब्ध राहिलांत, तें सांगावें. आपण अगोदर कां सांगितलें नाहींत? आपल्या सांगण्यावर आम्ही विश्वास ठेवला असता. मग स्तब्ध राहाण्याचें कारण काय ? "

आर्या कौशिकीनें उत्तर दिलें, " मी वर्षभर कां स्तब्ध राहिलें, याचें कारण सांगण्याची वेळ आज वर्षानेंच आलेली आहे. ही मालविका लहान होती, तेव्हां कोणी एक ज्योतिषी माधवसेनाच्या दरबारीं आलेला होता. त्यानें हिचें भविष्य वर्तविलें होतें कीं, ' एक वर्षभर हिला दास्य करावें लागेल. त्यानंतर तिचें कल्याण होईल. ' त्याप्रमाणेंच घडून येत होतें. एक वर्षाचा दास्याचा कालावधि उलटणें योग्यच होतें. म्हणून मी स्तब्ध राहिलें. समजलें? आतां सर्व कांहीं चांगलें घडून येईल." यानें सर्वांचें समाधान झालें.

ही हकीकत सांगून संपते न संपते तोंच अमात्याकडून राजाला निरोप आला कीं, " विदर्भराज्य जिंकलेलें आहे. त्याची व्यवस्था कशी करावयाची, यासंबंधीं आपला अभिप्राय कळवावा. "

राजानें कळविलें कीं, " विदर्भाचें राज्य त्या दोन

भावंडांतच विभागून द्यावें. एकाला वरदा नदीच्या उत्तरेस, दुसऱ्याला वरदा नदीच्या दक्षिणेस."

हा निरोप प्रधानमंडळाला संमत झाला. तोंच पुन्हां एक पत्र त्यांचेकडून त्याला आलें. त्याचा आशय असा होता--राजा, तुझा पुत्र जो वसुमित्र त्यानें फारच मोठा पराक्रम केलेला आहे. माझा यज्ञीय अश्व यवनांनीं हिरावून नेला होता. पण या कुमार वसुमित्रानें मोठ्या शर्थीनें त्यास सोडवून आणलें. आतां माझा यज्ञ निर्विघ्नपणें पार पडेल. तूंहि आपल्या परिवारासह यज्ञाच्या समाप्तीसाठीं यावेंस. आशीर्वाद.

हें पत्र पुष्यमित्राकडून अग्निमित्रास आलेलें होतें.

आनंदाच्या एका ऊर्मीमागून दुसरी ऊर्मि उत्पन्न होत होती. धारिणीला ब्रह्मांड ठेंगणें झालें. ती वीरपत्नी तर होतीच, आणि आतां ती वीरमाता ठरली. इरावतीसहित सर्वांनाच या विजयानें आनंद झाला. राणी धारिणीच्या मनांत कांहीं आलें. तिनें मालविकेला म्हटलें, "तुझे मनोरथ मला पूर्ण करावयाचे होतेच. ते आतां पूर्ण करीत आहें." ती राजाकडे वळून म्हणाली, "महाराज, ही माधवसेनाची बहीण अगोदरच आपणाला द्यावयाची

होती. तीच ही मालविका मी आतां आपणांस अर्पण करीत आहें. हिचा आपण स्वीकार करावा. महाराज, मी आपलें आणखी काय प्रिय करावें ?"

राजा त्यावर म्हणाला, "मी दुसरें काय आणखी मागणार? तूं नेहमीं मजवर अशीच प्रसन्न राहावीस, एवढेंच मी मागतों."

अनुक्रम २०५५८
विभाग
नों. दि.

IRBK-0105766

IRBK-0105766

नों. दि.

**पहिली अखंड भरारी** (The Spirit of St. Louis)

अनु. : शं. ल. चिटणीस — चार्ल्स लिंडबर्ग

न्यूयॉर्क ते पॅरिस अखंड विमान-भरारीची ती रोमांचकारी सत्यकथा स्वत: वैमानिकच सांगत आहे. रु. १–८–०

**अणूची कथा** (Report on the Atom)

अनु. : प्रा. एम. पी. जंगी — गॉर्डन इव्हॅन्स डीन

अणुयुगाच्या पहिल्या दहा वर्षांचा हा आढावा सामान्य माणसालाहि अणूचें यथार्थ-दर्शन घडवील. रु. १–८–०

**महान परिवर्तन** (The Big Change)

अनु. : शं. ल. चिटणीस — फ्रेड्रीक ल्युइस अॅलन

अमेरिकेच्या जीवनांत केवळें हें विलक्षण स्थित्यंतर चालू शतकाच्या पूर्वार्धांत घडून आलें आहे ! रु. १–८–०

**अॅब्राहम लिंकन** (Abraham Lincoln)

अनु. : गोपाळराव कुलकर्णी — एमिल लुड्विग

मुक्त झालेल्या गुलामांच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रु उभे राहिले. त्यासाठींच लिंकन जगला व हुतात्मा झाला. रु. १–८–०

**वादळ** (Storm)

अनु. : प्रा. य. ग. नाईक — जॉर्ज स्टुअर्ट

ही आकर्षक हकीकत एका काल्पनिक वादळाची खरी पण कादंबरीइतकीच चटकदार ! रु. १–८–०



वोरा अॅन्ड कं., पब्लिशर्स, प्रायव्हेट लि., मुंबई २.